# टॅब्लेटचं आक्रमण

गलिव्हरच्या गोष्टी वाचल्यात कधी ? किंवा तो हिंदी सिनेमा पाहिलाय ज्यात हिरो एका बेटावर जातो जिथे सगळी इवली इवली माणसं असतात? ती माणसं मोठ्या माणसाला हरवतात. युद्धात नेहमी मोठी साईझ जिंकते असं नाही. कधी कधी smaller is winner.  कॉम्प्युटरमध्ये तर नक्की तसंच आहे. म्हणून कॉम्प्युटर, डेस्कटॉप, लॅपटॉप पाठोपाठ आता आलेत टॅब्लेट्स.  अगदी हातात मावतील असे कॉम्प्युटर्स. एका एका टॅब्लेटमध्ये ३००० पुस्तकं मावू शकतील. म्हणजे एक अख्खी लायब्ररी. उद्या शाळा कॉलेजातली मुलं दप्तरा ऐवजी टॅब्लेट्स घेऊन शाळेत जाताना दिसतील. आणि पेन पुस्तक वह्या शो साठी भिंतीवर लटकवलेले दिसतील. किंवा म्युझियम मध्ये भूर्जपत्रांच्या आणि ताम्रपत्रांच्या किंवा शिलालेखांच्या शेजारी आपली आताची पुस्तकं असातील.

एखाद्या शंभर पानी वहीहूनही लहान अशा या रिडर मध्ये तीन चार हजार (!) पुस्तकं  सहज साठवता येतात. हवं ते पुस्तक, हवं ते पान काढून वाचता येतं. अक्षरांची साईझ लहान मोठी करता येते. हवा तो शब्द देऊन या तीन हजार पुस्तकांतून हवी ती माहिती शोधता येते. वाचायचा कंटाळा आला तर त्या पुस्तकाला बोलतं करता येतं. मायक्रोफ़ोन कानाला लावून पुस्तक ऐकता येतं. त्याचा मल्टिमिडिया अनुभव घेता येतो. पुस्तक मागवायला एक मिनिट लागतं. kobo, अलेक्स, किंडल, ऍपल आयपॉड, सोनी, अशी अनेक ई बुक रिडर्स विक्रीला आलीत. ईपब ( ईपब्लिकेशन) सारखी नवनवीन ई बुक सॉफ़्टवेअर्स आलीत. सध्या आम्ही ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े जी ई बुक्स साधारण एक लाख प्रती प्रसारित करतो त्यांना पाच हजार रुपये खर्च येतो. म्हणजे पाच पैशाला एक प्रत. ई बुक्स अत्यंत स्वस्त असणार. कागदाची गरज नसणार. छपाई यंत्रांची गरज नसणार. पुस्तक ई मेल ने जाणार. त्याला गाडीची गरज नसणार. जगाच्या एका कोपर्‍यातून दुसर्‍या कोपर्‍यात एक सेकंदात हे पुस्तक जाणार. (ओह. मी भविष्यकाळात का लिहीतोय. हे आता घडतंय. आमची ई बुक्स काही मिनिटांत सव्वा लाख लोकांकडे जातात बिना खर्चाने. आजवर आम्ही दोन तिनशे ई बुक्स विनामूल्य वितरीत केली आहेत. एक सव्वा लाख प्रती एका पुस्तकाच्या.)

हे पुस्तक दिसेल कागदाच्या पुस्तकासारखंच. तीन चार हजार पुस्तकांची लायब्ररी खिशात बाळगता येणार. पुस्तकातलं पान शोधायला सर्च इंजिन असणार. पुस्तक याच्याकडून त्याच्याकडे द्यायला सोपे मार्ग असणार. कोबो च्या रिडरला आताच ब्ल्यु टुथ आहे. म्हणजे एकजण आपल्या रिडर मधलं पुस्तक दुसर्‍याला कॉपी करून

देऊ शकतो. अलेक्स च्या ई बुक रिडरमध्ये मेल आहे. पुस्तकं मेल करता येतील. तशी तर ई बुक्स कॉम्प्युटरवर वाचता येतातच. पण ई बुक रिडर च्या स्क्रीनला पुस्तकाच्या कागदाचा फ़ील असणार. उन्हात सुद्धा तॊ वाचता येणार. त्याची पानं बोटाने (थुंकी न लावता , पानाला न मोडता)  पलटता येणार. ती वाचायला डोळयांना दुखवावं लागणार नाही. रिडरच ते आपल्या कानात वाचून दाखवेल. अजून काय सोय हवी ? हो ब्रेल लिपीतली ई बुक्स सुद्धा बाजारात आली आहेत. अंधानांही आता खिशात ३-४००० पुस्तकं घेऊन फ़िरता येणार आहे. वाचता न येणाऱ्याला पुस्तकं ऐकता येणार आहेत. अजून काय हवंय.

साठेक वर्षापुर्वी तीन मिनिटाच्या एका गाण्याची एक ताटाएवढी रेकॉर्ड असे. नंतर एल पी आल्या. त्यात दोन किंवा तीन गाणी असत. मग कॅसेट आल्या. त्यात ६-८ गाणी असत. नंतर ९०च्या कॅसेट आल्या. मग सीडी. डिव्हिडी असं होत होत आता आयपॉड मध्ये हजार हजार गाणी सेव्ह असतात. म्हणजे पुर्वी एका खोलीत जेवढ्या रेकॉर्ड असत तेव्हढ्यासाठी एक चिमूट्भर आकाराचा आयपॉड असतो. उद्या पुस्तकांचं तेच होणारे. आज ग्रंथालयात असतात तितकी पुस्तकं माणसं खिशात घेऊन फ़िरणार आहेत.

पण त्यासाठी मराठी  ई बुक्स बनवायला हवीत. नाहीतर फ़क्त इंग्रजी ई बुक्स असतील. आणि आपल्या भाषा कशा असतात याचा मुलांना गंधही नसेल.

मुलं आणखी काही वर्षांनी दप्तराऐवजी ई बुक रिडर घेऊन शाळेत जातील. वाचनालयांत पुस्तकं ई फ़ॉर्ममध्ये असतील. वर्तमानपत्रं ई रिडर वर असतील. आताचे मोबाईल जसे कॅमेरा, म्युझिक,  गेम अशा तऱ्हा तऱ्हा करतात तशीच तेव्हाची ई बुक्स असतील. त्यात व्हिडिओ क्लिप असतील. आवाज असतील. चित्रं असतील. वाचनाचा वेग ठरवता येईल असे रिडर्स असतील. मुलांना कागदाच्या पुस्तकांबद्दल त्यावेळी आश्चर्य असेल.

ई बुकवर वाचता येणाऱ्या भाषा पण लिमिटॆडच असतील. इंग्रजीत आज(२०१२) साडेचार कोटीहून अधिक ई बुक्स तयार आहेत. इंग्रजी, आणि इतर युरोपियन भाषांबरोबर चिनी आणि जपानी भाषांतही असंख्य ई बुक्स आहेत. प. बंगाल सरकार आणि बांगला देश यांच्या संयुक्त प्रयत्नांनी बंगालीतही शेकडो पुस्तकं निघताहेत. तमिळ सरकारचा एक मोठा प्रकल्प आहे ज्यात सरव तमिळ पुस्तकांचं डिजिटायझेशन होतं आहे. जगातलं सगळं ज्ञान आता या ईबुकांत जमणार आहे. आज तीन चार हजार पुस्तकं सामावणारे रिडर्स प्रगती करत उद्या लाख लाख पुस्तकांना आपल्या पोटात सामावतील. माणसाची ज्ञानाची भूक भागवतील. वाढवतील. पुढे येणाऱ्या स्मार्ट हुषार पिढ्या ई बुक्स वरच शहाणपण शिकतील.

या सगळ्यात दहाबारा कोटींची माय, माझ्या तुकयाची ज्ञानोबाची मराठी असेल ना? पुढच्या पिढ्यांना ही भाषा माहित होणार की नाही? हे ठरवणं आजच्या पिढीच्या हातात आहे. कधी नव्हे इतका महत्त्वाचा हा बदल आज घडून येतो आहे. बदल हा जीवनाचा स्थायी भाव आहे. त्या बदलाचा मागोवा घेऊन आपण सज्ज रहायचं की या स्पर्धेत आपल्याला काहीच झेपणार नाही असं म्हणून पळ काढायचा हे ठरवायचंय. हे ठरवायचंय ते आपण. हे ठरवायचंय ते आत्ता. या घडीला. आत्ता. या घडीला. आत्ता. आपण. आज. आत्ता. आणि आपण जर काहीच केलं नाही तर ... तर म्युझियममध्ये शिलालेख आणि भुर्जपत्रांच्या रांगेत मराठी नांवाची एक भाषा असेल.